# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः27.11.2024** **वारःबुधवार**

---

1. संविधानाद्वारे सामाजिक न्याय, सर्वसमावेशक विकासाची उद्दीष्ट्य साध्य होतात असं राष्ट्रपतींचं प्रतिपादन
2. देशाच्या सुरक्षेविरोधातल्या कोणत्याही दहशतवादी संघटनेला चोख प्रत्युत्तर देण्याच्या भारताच्या संकल्पाचा पंतप्रधानांकडून पुनरूच्चार
3. देशात एक कोटी ज्येष्ठ नागरिक, निवृत्तीधारकांना हयातीचा डिजीटल दाखला देण्याची प्रक्रिया पूर्ण
4. इस्त्रायल आणि लेबनॉन दरम्यान युद्धविराम लागू आणि
5. आठ वर्षाखालील जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या दिवीथ रेड्डीची सुवर्णपदकाला गवसणी

**<u>राष्ट्रपती</u>**

प्रत्येक नागरिकाने भारतीय राज्यघटनेतील आदर्श मूल्यांचा अंगीकार करून आपली मूलभूत कर्तव्य पार पाडावीत आणि विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी कार्यरत राहावं, असं आवाहन राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी केलं. संविधान दिनानिमित्त नवी दिल्लीत संविधान सदनाच्या सेंट्रल हॉलमध्ये आयोजित भव्य कार्यक्रमाला त्या संबोधित करत होत्या. आपलं संविधान म्हणजे एक जिवंत आणि प्रगतीशील दस्तऐवज आहे; त्याद्वारे देश सामाजिक न्याय आणि सर्वसमावेशक विकासाची उद्दिष्ट साध्य करत आहे, असं राष्ट्रपती म्हणाल्या. उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनीही यावेळी आपले विचार मांडले. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, पंतप्रधान नरेंद्र मोदी, संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू, लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्यासह अन्य मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी संविधानाच्या उद्देशिकेचं सामूहिक वाचन करण्यात आलं. संविधान स्वीकृतीच्या अमृत महोत्सवानिमित्त काढलेल्या 75 रुपयांच्या नाण्याचं, तसंच टपाल तिकिटाचं अनावरण राष्ट्रपतींच्या हस्ते झालं. संविधानाच्या निर्मितीचा इतिहास आणि प्रक्रिया उलगडून दाखवणाऱ्या दोन पुस्तकांचं अनावरणही यावेळी झालं. तसंच संविधानाच्या संस्कृत आणि मैथिली भाषेतल्या प्रती यावेळी प्रकाशित करण्यात आल्या.

**<u>पंतप्रधान संविधान</u>**

देशाच्या सुरक्षिततेला आव्हान देणाऱ्या कोणत्याही दहशतवादी संघटनेला चोख प्रत्युत्तर देण्याच्या भारताच्या संकल्पाचा पुनरूच्चार काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. संविधान दिनानिमित्त सर्वोच्च न्यायालयात आयोजित कार्यक्रमात पंतप्रधान संबोधित करत होते. लोकशाहीचा महत्त्वाचा उत्सव साजरा करत असतानाच, मुंबईवरील 26/11 च्या दहशतवादी हल्ल्याला 16 वर्ष झाल्याचे विस्मरण राष्ट्राला होऊ शकत नाही, असं सांगून पंतप्रधानांनी हल्ल्यातल्या शहीदांचे स्मरण करून त्यांना श्रद्धांजली वाहिली. संविधान देशाच्या अपेक्षा आणि गरजा पूर्ण करत असून ते नागरिकांना मार्गदर्शक ठरत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. गेल्या पंच्चाहत्तर वर्षात देशासमोर जेव्हा आव्हाने उभी ठाकली त्यातून पुढे जाण्यासाठी संविधानानेच मार्ग दाखवला आहे. अगदी आणीबाणीसारखे आव्हानही घटना त्यामुळे पेलू शकली. स्वातंत्र्यानंतर प्रथमच जम्मू आणि काश्मिरमध्ये संविधान दिन साजरा करण्यात आल्याचंही त्यांनी सांगितलं. राष्ट्र बदलाच्या महत्त्वाच्या टप्प्यातून वाटचाल करत असताना देशाची राज्यघटना भविष्यासाठी पथदर्शी असल्याचंही त्यांनी नमूद केलं. या समारंभाला सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना, केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल तसंच मान्यवर उपस्थित होते. संविधान दिवस हा केवळ घटना स्वीकारण्याचा उत्सव नसून तो जीवन

जगण्याचा उत्सव म्हणून साजरा होत असल्याचं प्रतिपादन सरन्यायाधीशांनी केलं. राज्यघटना हा भारतीय नागरिकांचा जीवनाचा मार्ग असल्याचंही ते म्हणाले.

**सहकार-अमित शहा**

वर्ष 2027 पर्यंत भारत जगात तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असेल, आणि या गौरवशाली प्रवासात सहकार मंत्रालय महत्त्वाची भूमिका बजावेल असा विश्वास केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी काल नवी दिल्ली इथं व्यक्त केला. राष्ट्रीय सहकारी बँक महासंघाच्या हीरक महोत्सवी सोहळ्यात शहा बोलत होते. विकासाच्या प्रवासात सहकाराचा सहभाग महत्त्वाचा असल्याचं सांगून, देशाच्या प्रत्येक नागरिकाला सामावून घेणारा विकास केंद्र सरकारला अपेक्षित असल्याचं ते म्हणाले. महासंघानं प्राथमिक कृषी कर्ज समिती म्हणजेच पॅक्स, जिल्हा सहकारी बँक, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि राज्य सहकारी बँका या त्रिस्तरीय संरचनेने देशातल्या शेतकरी आणि गावांच्या प्रगतीमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असल्याचं त्यांनी नमूद केलं. जिल्हा मध्यवर्ती बँक आणि राज्य सहकारी बँका सक्षम, निरोगी रहाण्यासाठी प्राथमिक कृषी कर्ज समित्या निरोगी राहिल्या पाहिजेत यावर भर देतानाच सहकार क्षेत्रात जगाला मार्गदर्शन करण्याची क्षमता भारतामध्ये असल्याचंही शहा यांनी नमूद केलं.

**DLC**

निवृत्तीवेतनधारक आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी डिजीटल स्वरुपातील हयातीचा दाखला अर्थात DLC देण्याच्या अभियानानं आतापर्यंत एक कोटी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण केली असल्याची माहिती कार्मिक मंत्रालयाचे राज्यमंत्री डॉ जितेंद्र सिंग यांनी काल दिली. या अभियानामुळे ज्येष्ठांना सहज आणि सोप्या पध्दतीनं हयातीचा दाखला उपलब्ध करुन देण्यात येत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतीच आकाशवाणीवरील मनकी बात कार्यक्रमांत या उपक्रमाची संकल्पना मांडली होती. देशभरातील आठशे शहर आणि गावांमध्ये अभियानाची तिसरी आवृत्ती राबवण्यात आली असून 1 ते 25 नोव्हेंबरदरम्यान 19 शे हून अधिक शिबीरांचं आयोजन करण्यात आल्याची माहितीही डॉ सिंग यांनी दिली.

**इस्त्रायल**

इस्त्रायलनं लेबनानसह इतर भागात सुरु असलेल्या युध्दविराम कराराची योजना असल्याचं काल रात्री जाहीर केलं. अमेरिकेनं मध्यस्थी केल्यानंतर ही योजना आखण्यात आल्याचं इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी सांगितलं. युध्दविरामा संदर्भात आज इस्त्रायलच्या मंत्रीमंडळात प्रस्ताव सादर केला. इस्त्रायली सैन्य आणि हिजबुल्ला दरम्यान 60 दिवसांचा हा युध्दविराम असेल. लेबनॉनच्या परराष्ट्रमंत्र्यांनी या कराराला आधीच पाठिंबा दर्शवला आहे. मात्र हिजबुल्लाहनं कराराचं उल्लंघन केल्यास त्वरित प्रत्युत्तर दिलं जाईल असा इशाराही नेतन्याहू यांनी दिला आहे. संयुक्त राष्ट्रानं या कराराचं स्वागत केलं आहे.

**बांग्लादेश**

बांग्लादेशमधील हिंदू समुदाय आणि इतर अल्पसंख्याकांची शांतता आणि सुरक्षा सुनिश्चित करावी असं आवाहन भारतानं बांग्लादेश सरकारला केलं आहे. अल्पसंख्याकांच्या मुलभूत हक्कांसाठी काम करणाऱ्या बांग्लादेश संमिलीत सनातन जागरण मंच चे प्रवक्ते प्रभु चिन्मय कृष्ण दास यांना नुकतीच अटक करण्यात आली होती. काल त्यांना जामीन नाकारण्यात आला. या घटनेबद्दल भारतीय परराष्ट्र मंत्रालयानं निवेदन जारी करुन तीव्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, प्रभु दास यांच्या सुटकेची मागणी करत चटगाव न्यायालयाच्या आवारात जमलेल्या इस्कॉन पुंडरिक धामच्या अनुयायांवर काल लाठीचार्ज करण्यात आला. गेल्या काही दिवसांपासून बांग्लादेशातील अतिरेकी घटकांकडून विविध भागात राहणाऱ्या हिंदूची घरं, आस्थापना लुटली जात असून मंदिरांची तसंच देवतांच्या मुर्तीची विटंबना केली जात आहे.

**<u>रशिया ब्रिटन</u>**

रशियानं, कथित हेरगिरीच्या आरोपानंतर ब्रिटनच्या दुतावासातील अधिकाऱ्याची हकालपट्टी केली आहे. हेरगिरी करण्याच्या उद्देशाने देशात प्रवेश करण्याच्या हेतूने जाणूनबुजून चुकीची माहिती दिली ज्यामुळे रशियाच्या कायद्याचं उल्लंघन झाल्याचा आरोप रशियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने केला आहे. रशियाच्या सरकारी माध्यमांनी दिलेल्या माहिती नुसार, या अधिकाऱ्यांची राजनयिक मान्यता रद्द करण्यात आली असून, दोन आठवड्यात त्याला देश सोडण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

**<u>रशिया क्रूड</u>**

रशिया हा भारताचा कच्च्या तेलाचा सर्वात मोठा पुरवठादार झाला आहे. देशाच्या कच्च्या तेलाच्या आयातीमधला 35 टक्क्यांहून अधिक वाटा रशियाचा असल्याची माहिती केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी काल दिली. नवी दिल्लीत काल फिपी तेल आणि वायू पुरस्कार सोहळ्यात पुरी बोलत होते. गेल्या दोन वर्षात देशाच्या तेलाच्या स्त्रोतांमध्ये झालेल्या बदलावर प्रकाश टाकत, फेब्रुवारी 2022 पासून रशियाकडून होणाऱ्या आयातीत सातत्यपूर्ण वाढ झाली असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**<u>दूध निर्माता</u>**

भारत जगभरातला सर्वात मोठा दूध उत्पादक असल्याचं प्रतिपादन मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय केंद्रीय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी काल दिल्लीतल्या कार्यक्रमात केलं. दिल्लीसह देशभरात काल राष्ट्रीय दुग्ध दिवस साजरा करण्यात आला. 2030 सालापर्यंत देशातलं पशुधन रोगमुक्त होण्यासाठी सरकार प्रयत्नशील असल्याचं सांगून रंजन म्हणाले की, पशुपालन व्यवसायाने देशाच्या आर्थिक विकासात मोठा हातभार लावला आहे. श्वेत क्रांतीचे पितामह म्हणवल्या जाणाऱ्या डॉ. वर्गीस कुरियन यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी 26 नोव्हेंबरला राष्ट्रीय दूध दिवस साजरा करण्यात येतो.

**<u>बुद्धिबळ दिवीथ</u>**

इटलीमध्ये सुरू असलेल्या आठ वर्षाखालील जागतिक कॅडेट बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या आठ वर्षांच्या दिवीथ रेड्डीनं सुवर्णपदकाला गवसणी घालत अजिंक्यपद पटकावलं. तेलंगणाच्या दिवीथनं, स्वकीय सात्विक स्नेवशी बरोबरी साधत 11 पैकी 9 गुण मिळवली ही कामगिरी केली. सात्विकने रौप्य तर चीनच्या झिमिंग गुओनं कांस्यपदक पटकावले.

**<u>पुदुचेरी पाऊस</u>**

बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे येत्या 29 नोव्हेंबरपर्यंत पुदुचेरीमध्ये मुसळधार पावसाची शक्यता असून, या कमी दाबाच्या पट्ट्याचं चक्रीवादळात रूपांतर होण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. संभवित आपत्तीची चाहूल घेत पुदुचरीच्या जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना तयारी सज्जता आणि उपाययोजनांचे समन्वयन करण्यासाठी काल बैठक घेतली. त्यामध्ये सर्व विभागांना जागरूक राहून नुकसान टाळण्यासाठी वेळेत पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत. या कमी दाबाच्या पट्ट्याचं रुपांतर फेंगाल चक्रीवादळात होण्याची शक्यता लक्षात घेऊन तामिळनाडूच्या तीन जिल्ह्यातही हवामान विभागानं लाल बावटा जारी केला आहे. मायिलाडुथुराई, नागापट्टिनाम आणि थिरूवरूर जिल्ह्यात अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

**याबरोबर आकाशवाणीवर राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार**